|| श्री गणेशाय नमः ||

# हरी ॐ धार्मिक पूजा विधी केंद्र

ज्योतिष आणि वास्तु सल्लागार

Astro • Puja • Vastu

## आरती श्रीदत्ताची

त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्त हा जाणा।। त्रिगुणी अवतार त्रैलोक्यराणा ।। नेति नेति शब्द न ये अनुमाना।।
सुरवर मुनिजन योगी समाधि न ये ध्याना।।१।।
जय देव जय देव जय श्रीगुरुदत्ता।। आरती ओवाळीतां हरली भवचिंता ।। धृ०।।

सबाह्य अभ्यंतरीं तूं एक दत्त ।। अभाग्यासी कैंची न कळे ही मात ।।
पराही परतली तेथें कैचा हेत ।। जन्ममरणाचा पुरलासे अन्त ।। जय० ।।२।।

दत्त येउनियां उभा ठाकला ।। साष्टांगें नमुनी प्रणिपात केला ।।
प्रसन्न होऊनी आशीर्वाद दिधला ।। जन्ममरणाचा फेरा चुकविला ।। जय० ।।३।।

दत्त दत्त ऐसें लागलें ध्यान।। हरपलें मन झालें उन्मन ।। मीतूंपणाची झाली बोळवण ।।
एका जनार्दनीं श्रीदत्त ध्यान ।।४।। जय देव जय देव जय० ।।

### आरती गुरुदत्ता

आरती गुरुदत्ता अवधुता नरहरी भाग्य विधाता आरती ।। मुढ जरी झालो भगवंता चरणी ठेउनी माथा ।।१।।
विसरुनी तव पाया अनुसुता ज्ञान उदेले आता ।।२।।
लीन तुझे ठाई गुरुनाथा तुचि आम्हा उद्धरीता ।। ३॥
तुजविण मज कोणी नच त्राता भक्तवत्सला ताता ।।४।।
नित्य तुझी सेवा मज होता अनुभवली तव ममता ।।५।।
नरहरी गुरुदत्ता श्रीमंता आरती घेई आता ।।६।।
आरती गुरुदत्ता अवधुता नरहरी भाग्यविधाता ॥

### धन्य हे प्रदक्षिणा आरती

धन्य हे प्रदक्षिणा सदगुरूरायाची । झाली त्वरा सुरवरा विमान उतरायाची ॥ धृ ॥
गुरुभजनाचा महीमा नकळे अगमानिगमांसी। अनुभविते जाणति जे गुरुपदिंचे अभिलाषी ॥ धन्य. ॥ १ ॥
पदो पदी झाल्या अपार पुण्याच्या राशी । सर्वही तिर्थे घडली आम्हां आदिकरूनि काशी ॥ धन्य. ॥ २ ॥
मृदंगताघोषी भक्त भावार्थे गाती ॥ नामसंकीर्तने नित्यानंद नाचताती ॥ धन्य. ॥ ३ ॥
कोटीब्रह्महत्या हरती करितां दंडवत । लोटांगण घालितां॥ मोक्ष लागे पायांता ॥ धन्य ॥ ४ ॥
प्रदक्षिणा करुनी देहभाव हरवीला । रिंगात्मत विठ्ठल पुढे उभा राहिला। धन्य हे प्रदक्षिणा ॥ धन्य ॥५॥


HARI OM DHARMIK PUJA VIDHI KENDRA

योगेशशास्त्री ढवळे (गुरुजी) : 95944 28749 | निलेशशास्त्री ढवळे (गुरुजी) : 86524 02078

SANPADA OFFICE
Office No.8, 1st Flr, Shiva Triveni Galleria CHS.,
Plot No. 13, Sector 8, Sanpada, Navi Mumbai

GOVANDI OFFICE
Shri Swaybhu Hanuman Mandir, Deonar
Mahanagarpalika Vasahat, Govandi, Mumbai.

hariom astrologers | hariom astrologers | hariom_astrologers
hariomastrologers@gmail.com | www.hariomastrologers.com